सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**उपवनसंरक्षक,पुणे वन विभाग,पुणे**

**सेनापती बापट मार्ग,पुणे ४११ ००४**

दूनध्वनी - ०२० २५६६ ०५९३ ई-मेल - dycfpune@gmail.com

---

क्रमांक:-ब/कक्ष-४-२/जमीन/ ६२९ /२०२०-२१ दिनांक:- ०६ /१२/ २०२१

पत्र

प्रति,

Section Engineer,
PWD Sub-Division Bhigwan,Pune.
E-mail-aegr1_pwdbhigwan@enviroconcern.in
Mb.No.8983460757

विषय:- Diversion of Forest Land for construction of two lane with paved shoulder SH-54 Bhigvan-Baramati Road (Chainage Km.145+000 to Km.173+166) under Maharashtra Road Improvement Programme. **(FP/MH/ROAD/144584/2021)**

संदर्भ:-१) आपले कार्यालयाकडील पत्र क्रं.जा.क्र.सा.बां.उपविभाग/शाखा/४७९,दि.२०.१०.२०२१
२) दिनांक ०३.१२.२०२१ रोजी निम्नस्वाक्षरीकर्ते यांचे दालनात झालेली आढावा बैठक

उपरोक्त विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.१ अन्वये Section Engineer, PWD Sub-Division Bhigwan,Pune यांनी वन(संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाची या कार्यालयाकडून छाननी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रूटी दिसून येत आहेत.

१. प्रस्तावामध्ये बाधीत होत असलेल्या क्षेत्राची खात्री करणेसाठी वन व वनेत्तर क्षेत्राचे सर्व्हे नंबर चे ७/१२ अभिलेख, गटाचे ७/१२ उतारे, गटस्किम उतारे, आकारबंद, सर्व्हे नंबरचा नकाशा, एकत्रीकरण नकाशा, वाडीविभाजनानंतरचे नकाशे इ. कागदपत्रे सोबत जोडण्यात यावेत.

२. प्रस्तावामध्ये रस्त्याचे मंजूर अंदाजपत्रकाची तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेचे आदेशाची छायांकित प्रत जोडलेली आहे. तथापी, वळतीकरण करावयाच्या वन व वनेतर क्षेत्रामधील प्रस्तावित कामाबाबत परिपुर्ण L Section जोडण्यात येऊन त्यावर साखळी क्रमांक नमूद करण्यात यावा. तसेच प्रस्तावामध्ये जोडण्यात आलेल्या Cross Section वर प्रकल्प यंत्रणा यांचे स्वाक्षरीसह जोडण्यात यावा.

३. तसेच अस्तित्वातील कल्वर्ट / मोऱ्याचे बाबत व नवीन करण्यात येणारे कल्वर्ट / मोऱ्याचे बाबत L Section प्रस्तावामध्ये जोडून साखळी क्रमांक नुद करण्यात यावे.

४. प्रस्तावामध्ये रस्त्याचे मंजूर तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेनुसार सुरूवातीचे ठिकाण ते अंतिम ठिकाणामध्ये बाधीत होणारे वन व वनेत्तर क्षेत्रानुसार प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

५. सदरचे प्रकल्पांतर्गत प्रस्तावीत कामाबाबत वनक्षेत्र १.०० हे.पेक्षा जास्त वळतीकरण होणार असल्यास वनक्षेत्राचे बदल्यात पर्यायी वनिकरणाबाबतचे क्षेत्राबाबतचा तपशील व दस्ताऐवज सादर करण्यात यावा.

अथवा, प्रस्तावीत कामाबाबत वनक्षेत्र १.०० हे. पेक्षा कमी वळतीकरण होणार असल्यास वनक्षेत्रपाल, इंदापूर यांचे कार्यालयाशी संपर्क साधून या प्रकल्पाअंतर्गत Degreeded Forest क्षेत्रावर १ हेक्टर वनीकरण करावयाची Afforestation Scheme व त्याची KML, Shape File ची CD व विहिती नमुन्यातील नकाशा दर्शविणे आवश्यक असुन तो प्रस्तावामध्ये समाविष्ठ करण्यात यावा.

६. ऑनलाईनमध्ये वरीलप्रमाणे आवश्यक ती दुरूस्ती करून पुर्तता करण्यात यावी.

वरीलप्रमाणे त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव ६ प्रतीत तात्काळ या कार्यालयास फेरसादर करावा.

(राहुल पाटील,भा.व.से.)
उपवनसंरक्षक,
पुणे वनविभाग,पुणे.

प्रत :- कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग (पुर्व) पुणे यांना माहितीसाठी अग्रेषित.

प्रत :- सहा.वनसंरक्षक (ववसं)/ (सांख्यिकी) / (वकॅई) पुणे यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.

प्रत :-वनपरिक्षेत्र अधिकारी,इंदापूर / बारामती / दौंड यांना वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.

२.०० त्यांना कळविण्यात येते कि, विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने वरीलप्रमाणे नमूद केलेनुसार प्रकल्प यंत्रणेनेचे प्रतिनिधींसोबत स्थळपाहणी करून बाधित होणा-या वन क्षेत्रातील वृक्षांची मोजदाद, प्रजातीनिहाय, वेढीनिहाय माहिती तसेच वृक्षतोडीचे अंदाजपत्रक व स्थळपाहणी अहवाल तसेच प्रस्तावित ग.नं.चा वैधानिक दर्जा व त्यामध्ये कोणती न्यायालयीन प्रक्रिया चालू आहे अथवा कसे याबाबतची माहिती सादर करण्यात यावी. तसेच वनभंग झाला आहे किंवा कसे याबाबत सविस्तर अवहवाल या कार्यालयास सादर करावा.

तसेच जर प्रस्तावीत कामाबाबत वनक्षेत्र १.०० हे. पेक्षा कमी वळतीकरण होणार असल्यास सदरचे प्रकल्पाअंतर्गत Degreeded Forest क्षेत्रावर १ हेक्टर वनीकरण करावयाची Afforestation Scheme व त्याची KML, Shape File ची CD व विहिती नमुन्यातील नकाशासह या कार्यालयास सादर करण्यात यावे.